# 'वाघ'च्या ४०५ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीमध्ये निवड

**नाशिक । दि. १० प्रतिनिधी**

क.का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील ४०५ विद्यार्थ्यांची गेल्या वर्षभरात विविध क्षेत्रात कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य के.एन. नांदूरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्राचार्य नांदूरकर म्हणाले, क.का वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात गेल्या वर्षभरात विविध मल्टिनॅशनल कंपन्यांमार्फत इंटरव्ह्यू घेण्यात आले. त्यात पदवी अभ्यासक्रमातील ३५० विद्यार्थ्यांची तर पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या पदांसाठी निवड झाली आहे. वर्षभरात ५५ कंपन्यांनी घेतलेल्या मुलाखतीमध्ये ३३ कंपन्या सॉफ्टवेअर तसेच आयआयटी क्षेत्रातील असून त्यात १४४ विद्यार्थ्यांना संधी मिळाली आहे. विशेष म्हणजे कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी भारतीय सैन्यदल तसेच तटरक्षक दलदेखील सहभागी झाले असल्याचे सांगण्यात आले. सध्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष फिल्डवरील अनुभव मिळावा यासाठी एच.आर. कनेक्ट ही संकल्पना राबवण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी बाहेर मुलाखतीसाठी जाताना काय काळजी घ्यावी इत्यादी माहिती मिळत आहे. वाघ महाविद्यालयातर्फे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशिनाथ टर्ले, चांगदेव होळकर, अशोक मर्चंट, देवराम शिंदे, समीर वाघ, विलास टर्ले, प्रा.के.एस.बंदी यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करून भावी जीवनात प्रामाणिकपणे काम करावे, असे आवाहन केले आहे.

## एच.आर. कनेक्ट संकल्पना

मागील वर्षापासून वाघ महाविद्यालयात एच.आर. कनेक्ट ही संकल्पना राबवली जात असून त्यात अनेक नामवंत कंपन्यांच्या एच.आर. मॅनेजर्सना महाविद्यालयात आमंत्रित करून विद्यार्थी आणि कंपनी यांच्यात सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यामुळे कंपन्यांना काय हवे आहे हे विद्यार्थ्यांना समजते. त्यानुसार आपला बायोडाटा, इ-मेल आयडी, कसा असावा इ.चा विद्यार्थी आपल्या सॉफ्टस्किलमध्ये समावेश करतात. एकूणच कंपन्यांना विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे आणि विद्यार्थ्यांनी नोकरीच्या दृष्टीने कशी तयारी करायला हवी याचे मार्गदर्शन हे एच.आर. कनेक्टद्वारे साध्य होते.

**देशदूत दिनांक :- ११-०६-२०१५**

# बड्या कंपन्यांनी निवडले ४०५ विद्यार्थी

## वाघ अभियांत्रिकीच्या यशाची पताका कायम

। नाशिक । वार्ताहर ।

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था संचालित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ४०५ विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूत निवड झाली आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ. के.एन. नांदुरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या शैक्षणिक वर्षात सुमारे ५५ कंपन्यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. मल्टीनॅशनल कंपन्यांतील टीसीएस, एल अ‍ॅण्ड टी, इन्फोटेक, ब्रिज स्टोन, एनव्हीडीया, फ्लोर डॅनियल, व्हर्टिस मायक्रोसिस्टीम्स, जेएसडब्ल्यू आणि केपीआयटी अशा नामवंत कंपन्या क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे इंजिनीअरिंग पदवी आणि पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांचे उच्च कौशल्य मनुष्यबळ निवडण्याच्या दृष्टीने बघतात. २०१४-१५ वर्षासाठी कॅम्पस इंटरव्ह्यू ऑगस्ट २०१४ पासून सुरू झाले. अजूनही सहा महिने ते चालू राहणार आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील ३५०, तसेच ५५ पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांचे विविध कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. त्यात २१९ मुले व १८५ मुली आहेत, असे नांदुरकर यांनी सांगितले.

५५ पकी ३३ कंपन्या सॉफ्टवेअर किंवा आय. टी. क्षेत्रातील असून त्यांनी २८० विद्यार्थ्यांची निवड केली. तसेच २० कंपन्या कोअर सेक्टरमधील असून त्यांनी १२४ विद्यार्थ्यांची निवड केली. या निवड प्रक्रियेत भारतीय सैन्यदल आणि भारतीय तटरक्षकदलही आले होते. भारतीय सैन्य दलात म ेकॅनिकल विभागातील नितीन केळकर या विद्यार्थीची आर्मी ऑफिसर म्हणून निवड झाली.

या वर्षामध्ये ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट विभागाने मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल, केमिकल आणि प्रॉडक्शन विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी आयटी स्कील वाढविण्याबाबत सी., सी. प्लस या प्रोग्रामिंग लँग्वेजेसचे विशेष ट्रेनिंगचे आयोजन करण्यात आले होते. त्याचमुळे वरील विभागाचे ४५ विद्यार्थ्यांचे आयटी क्षेत्रातील टीसीएस., इन्फोसिस, आयबीएम, फिन आयक्यू इत्यादींमध्ये निवड झाली आहे. व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप महत्त्वाची असते. त्यामुळे शिकत असतानाच कंपनीच्या कामकाजाचा अनुभव मिळू शकतो. यावर्षी एमसीएच्या २६ व एमईच्या ०२ विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये इंटर्नशिपची संधी मिळाली आहे. या संधीचे रुपांतर त्याच कंपनीत नोकरीच्या ऑफरने होऊ शकते. या उच्चांकी प्लेसमेंट होण्याचे कारण म्हणजे संस्थेचे ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट प्रमुख प्रा. पी. के. शहाबादकर यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागाने राबविलेले ट्रेनिंग प्रोग्राम्स, मॉक इंटरव्ह्यू, टेक्निकल आणि जनरल नॉलेज स्पर्धा, ग्रुप डिस्कशन, तसेच मुलाखतीचे तंत्र अवगत करण्यासाठी दिलेल्या प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांना लाभ झाला, असे ते म्हणाले. पत्रकार परिषदेला संस्थेचे सचिव प्रा. के.एस. बंदी, उपप्राचार्य डॉ. शिरीष साने, प्रा. पी. के. शहाबादकर, प्रा. संजीव अहिरे उपस्थित होते.

***Gawakari News Paper Dated :- 10-06-2015***

Sakal News Paper Dated:- 09-06-2015

# 'क.का'च्या ४०५ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ८ : कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ४०५ विद्यार्थ्यांची २०१४-१५ शैक्षणिक वर्षात कॅम्पस इंटरव्ह्यूत निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना सरासरी साडेतीन लाख रुपयांचे पॅकेज मिळाले असून, सात लाखांपर्यंतचे सर्वाधिक पॅकेज आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी दिली.

२०१४-१५ या शैक्षणिक वर्षाचे कॅम्पस इंटरव्ह्यू ऑगस्ट २०१४ पासून झाले होते. अजून सहा महिने मुलाखती घेतल्या जाणार आहेत. अभियांत्रिकी महाविद्यालयातील ३५० विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झाली. तसेच, ५५ पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. निवड झालेल्या एकूण ४०५ विद्यार्थ्यांमध्ये २१९ मुले व १८५ मुली आहेत. तसेच, कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी आलेल्या ५५ कंपन्यांपैकी ३३ कंपन्या सॉफ्टवेअर, आयटी क्षेत्रातील असून, त्यांनी २८० विद्यार्थ्यांची निवड केली आहे. २० कंपन्या कोअर सेक्टरमधील असून, त्यांनी १२४ विद्यार्थ्यांना निवडले. भारतीय सैन्यदलात मेकॅनिकल विभागातील नितीन केळकर या विद्यार्थ्याची अधिकारी म्हणून निवड झाली. विद्यार्थ्यांना सरासरी साडेतीन लाख रुपयांचे पॅकेज मिळाले आहे. ३५ विद्यार्थ्यांना चार ते सहा लाख रुपयांचे पॅकेज मिळाले आहे. संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी म्हणाले, की विद्यार्थ्यांना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रवेश घेतल्यानंतर तातडीने विद्यार्थ्यांना विविध विषयांचे प्रशिक्षण दिले जाते. ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूचा आढावा घेतला. पत्रकार परिषदेस डॉ. एस. एस. साने उपस्थित होते.

सकाळ तंत्रभूमी

# क. का. वाघ कॅम्पस इंटरव्ह्यूत अद्वितीय

**शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये क. का. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या ३८७ विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे नामवंत कंपन्यांतून नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत. दोन विद्यार्थ्यांना सात लाखांचे, तर इतर ३५ विद्यार्थ्यांना पाच लाखांचे पॅकेज मिळालेले आहे, अशी माहिती देताना प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या चेहऱ्यावरील समाधान क. का. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या योगदानाची ग्वाही देते.**

सुमारे ५० कंपन्यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रात क्रॉम्प्टन ग्रीव्हज, टीसीएस, एल अँण्ड टी इन्फोटेक, केपीआयटी टेक्नॉलॉजी पुणे, एनव्हिडिया, पर्सिस्टन्स सिस्टिम लि., फीन आयक्यू, एरिज या नामवंत कंपन्यांनी क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयास भेट देऊन सुमारे १२५ विद्यार्थ्यांची आणि २६ एम.सी.ए. विद्यार्थ्यांची सहा महिन्यांच्या इंटर्नशिपसाठी निवड केली. या वर्षाच्या कॅम्पस इंटरव्ह्यूचे लक्षणीय यश म्हणजे एम.सी.ए.ची प्राची काकळीज या विद्यार्थिनीची ऑस्ट्रेलियाच्या नामांकित कंपनीत निवड झालेली आहे.

कॉम्प्युटर अभियांत्रिकीच्या अस्मिता गौतम व मुकेश भारसाखळे यांना एनव्हिडिया या कंपनीने सात लाखांचे वार्षिक पॅकेज दिले. केमिकल इंजिनिअरिंगचे दोन विद्यार्थी अजिंक्य देशमुख, नीलेश पगारे यांची दुबईच्या कन्सल्टंट कंपनीने पाच लाखांचे पॅकेज देऊन निवड केली. तसेच फ्लोर डॅनिएल या नामांकित कंपनीने मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या तेज दुबे व कुणाल मोदी या विद्यार्थ्यांना साडेचार लाखांचे पॅकेज देऊन निवड केली आहे.

द्वितीय सत्रामध्ये जेएसडब्ल्यू स्टील्स, आयबीएम, ऋषभ इन्स्ट्रुमेंट्स, इन्फोसिस, व्होडाफोन, ब्रीजस्टोन, विप्रो टेक्नॉलॉजी, भारतीय सैन्यदल, ईएसडीएस, डाटामॅटिक, नेटविन इन्फोसोल्यूशन्स, विनजित टेक्नॉलॉजी, फ्लोर डॅनिएल, महिंद्र अँण्ड महिंद्र, बॉश आदींनी इंजिनिअरिंग, एमबीए आणि एमसीएच्या मुलांचे कॅम्पस इंटरव्ह्यू घेऊन सुमारे २७० विद्यार्थ्यांची निवड केली. दोन्ही सत्रांत मिळून ३८७ विद्यार्थ्यांची आतापर्यंत निवड झालेली आहे. अजूनही मेकॅनिकल आणि कन्स्ट्रक्शन इंडस्ट्रीतील काही बहुराष्ट्रीय कंपन्या कॅम्पस इंटरव्ह्यू घेत असून, या शैक्षणिक वर्षात ४०० च्या वर विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळतील, अशी आम्हाला आशा आहे. गेल्या वर्षी ३०३ विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे नोकऱ्या मिळालेल्या आहेत.

या संस्थेत घसघशीत वाढ होण्याचे कारण म्हणजे संस्थेचे ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. पी. के. शहाबादकर यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट विभागाने घेतलेले विविध ट्रेनिंग प्रोग्राम्स. विद्यार्थ्यांना मुलाखतीचे तंत्र अवगत करण्यासाठी दिलेले प्रशिक्षण, ग्रुप डिस्कशन, ॲप्टिट्यूड टेस्ट, मॉक इंटरव्ह्यू, टेक्निकल आणि जनरल नॉलेज स्पर्धा इत्यादी सातत्याने राबविण्यात आले. त्यातून विद्यार्थ्यांचे सॉफ्ट स्किल डेव्हलप केले. २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात एचआर समितीही आयोजित करण्यात आली होती. एचआर समितीच्या माध्यमातून विद्यार्थी, महाविद्यालय आणि उद्योग यांच्यात समन्वय साधला जाऊन कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. या प्रयत्नांमुळेच या शैक्षणिक वर्षात वरील प्रमुख कंपन्यांनी विद्यार्थ्यांच्या निवडीस प्राधान्य दिले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल क. का. वाघ शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, उपाध्यक्ष काशीनाथदादा टर्ले, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोकभाई मर्चंट, देवराम शिंदे, समीर वाघ, विलास टर्ले, डॉ. एस. एस. साने, डॉ. पी. डी. पाभरे आणि सचिव प्रा. के. एस. बंदी यांना अपरिमित समाधान तसेच विद्यार्थ्यांच्या मेहनतीचेही कौतुक आहे.

**कॅम्पस इंटरव्ह्यू २०१५-१५ ची कामगिरी**

| वार्षिक पॅकेज | विद्यार्थिसंख्या |
|---|---|
| ७ लाख | ०२ |
| ४ ते ६ लाख | ३५ |
| ३ ते ४ लाख | १७९ |
| २ ते ३ लाख | |

### केपीआयटी कंपनीशी शैक्षणिक सामंजस्य करार

क. का. वाघ शिक्षणसंस्थेने पुण्याच्या केपीआयटी टेक्नॉलॉजीज प्रा.लि. या प्रसिद्ध सॉफ्टवेअर कंपनीबरोबर शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. त्याअंतर्गत महाविद्यालयाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांना केपीआयटीमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. त्यातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. या कराराच्या माध्यमातून प्रशिक्षण, रोजगार संधींसह संयुक्त संशोधन प्रकल्पदेखील सुरू करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या शेवटच्या वर्षाच्या प्रकल्पासाठी तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन केले जात आहे.